# कोरोनातील दुनिया विद्यार्थ्यांची...



- संपादक -


## डॉ. मयुर बंडू लहाने

बी. ए. (हिंदी), एम.ए. (इंग्रजी), एम.ए. (मराठी),

डि.एड., बी.एड., एम.एड., एल. एल. बी., पीएच.डी.


Sakri (Dhule)

PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

- कोरोनातील दुनिया विद्यार्थ्यांची...
  संपादक : डॉ. मयुर बंडू लहाने

- CORONATIL DUNIYA VIDYARTHYANCHI...
  Editor : Dr. Mayur Bandu Lahane


- ISBN : 978-81-952462-0-5



- © डॉ. मयुर बंडू लहाने
  राम मंदिर जवळ पेठ पुरा हिवरखेड (रूप.)
  ता. तेल्हारा जि. अकोला ४४४१०३.



- **प्रथमावृत्ती**
  १५ ऑगष्ट २०२२

- **मुखपृष्ठ**
  डॉ. मयुर बंडू लहाने

- **अक्षरजुळवणी**
  डॉ. मयुर बंडू लहाने
  आकांक्षा पब्लिकेशन
  ९०९६५९३८४२

- **प्रकाशक व मुद्रक**
  डॉ. मयुर बंडू लहाने
  आकांक्षा पब्लिकेशन
  हिवरखेड (रूप.) ता. तेल्हारा जि. अकोला
  ९०९६५९३८४२

- Email ID : akankshajournal@gmail.com
  lahane_mayur@rediffmail.com

- **मुल्य : २५० /-**



या पुस्तकातील मजकुराशी प्रकाशक किंवा संपादक सहमत असतीलच असे नाही. लेखातील मजकुर हे लेखकाचे स्वतंत्र विचार आहेत. तसेच कोणताही मजकुर, कोणत्याही स्वरूपात वा माध्यमात पुर्नप्रकाशित अथवा संग्रहित करण्यासाठी लेखकाची पुर्वपरवानगी घेणे बंधनकारक आहे.



Sakri (Dhule)

PRINCIPAL

# अ नु क्र म णि का


१. एकलकोंड्या झालेल्या मुलांचे नुकसान मोजता येणे अशक्य !
– प्रा. डॉ. मयूर बंडू लहाने १–३

२. कोरोना : संधी आणि आव्हाने
– प्रा. किशोर बुटले ४–५

३. कोरोना आणि जग
– डॉ. मधुकर विठोबा जाधव ६–१०

४. कोरोना महामारी आणि भारतीय संस्कृती
– प्रा. डॉ. वसुमती पी. पाटील ११–१५

५. कोरोनाचे सामाजिक व अर्थिक परिणाम
– प्रा. डॉ. दत्तात्रय मल्हारी चौधरी १६–२०

६. लॉकडाऊनच्या काळातील – माझ्या अंगणातील शाळा
– श्री रामचंद्र चंद्रू पाटील २१–२४

७. लॉक डाऊनच्या काळातील आमच्या शाळेचा नावीन्यपूर्ण उपक्रम 'स्वयंअध्ययन व्याख्यानमाला' !
– श्री मोहन शिरसाट २५–२८

८. कोर्रोना समाजमानवरील परिणाम
– प्रा. रिता वाळके २९–३४

९. Covid-19 and changes in Education
– Dr. Sanjay B. Choudhari ३५–३९


Sakri (Dhule)

PRINCIPAL

 ISBN : 978-81-952462-0-5

# ४. कोरोना महामारी आणि भारतीय संस्कृती

**प्रा. डॉ. वसुमती पी. पाटील**

५७, जयहिंद कॉलनी,

साक्री. जि. धुळे – ४२४३०४

आज सारे विश्व कोरोना महामारीच्या संकटाने ग्रासले आहे. आपण अशा कठीण परिस्थितीशी सामना करीत असतांना अनेक चांगल्या सकारात्मक गोष्टींकडे झुकलो आहोत अगदी माणसाच्या आयुष्याची दिशा सुद्धा बदललेली दिसते. कोरोनामुळे देशाच्या आर्थिक, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक अशा अनेक बाबतीत प्रचंड नुकसान झाले आहे परंतु तरी देखील दुसऱ्या बाजुने आपल्या भारतीय संस्कृती की जी प्राचीन काळापासुन पूजनीय आहे. त्या संस्कृतीच्या मूल्यांचा स्वीकार करू लागलो आहोत.

भारतीय संस्कृतीचा महिमा अवर्णनीय आहे. साने गुरुजींनी म्हटल्याप्रमाणे भारतीय संस्कृती संग्राहक आहे तसेच सर्वांना जवळ घेणारी आहे हृदय व बुध्दी यांची पूजा करणारी आपली भारतीय संस्कृतीची आठवण आपणास झाली ती अशा संकटाच्या वेळेस आणि आपणासाठी सरोखरच उपकारक आहे. भारतीय संस्कृती आणि सभ्यता विशालता ही 'वसुधैव कुटुंबकम्' च्या पवित्र भावनेतून स्पष्ट होते. भारतीय संस्कृती गतिशील आहे. भारतीय संस्कृती विश्वातील प्राचीन संस्कृतीमधील एक आहे. अर्थात भारत देशातील सभ्यता अशी आहे की ज्यामध्ये बहुरंगी विविधता आणि समृद्ध सांस्कृतिक वारसा आहे. तसेच भारतीय संस्कृती विभिन्न सांस्कृतिक धारांचा महासंगम आहे. कोरोना या महामारीने त्रस्त मानवी जीवन लॉकडाऊनच्या काळात प्रत्येक व्यक्ती स्वत: सोबत कुटुंबियांच्या स्वास्थ्या बाबतीत जागरूक झाला आहे.

भारतीय संस्कृती योगमय आहे. आपल्या योगमय संस्कृतीचे प्रतिबिंब आज घरा–घरांमध्ये दिसू लागले आहे. आज प्रत्येक जण हा योगासन, प्राणायाम, सात्त्विक आहार, संयम या सर्व बाबींकडे झुकलेला आहे. पाश्चात्य संस्कृतीच्या अंधानुकरण पासून काही काळ का असेना लहान–थोर सगळेच बाजुला होऊन सात्विक



Sakri (Dhule)
PRINCIPAL
Dr. B. S. Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist Dhule

ISBN : 978-81-952462-0-5

जीवनशैलीचा ओघ दिसतो आहे. एका दृष्टीने हा मात्र भविष्यासाठी एक चांगला संकेत ठरू शकतो. तसेच कोरोनामुळे पैसा हा महत्वाचा नसुन माणुसकी महत्वाची आहे ही भावना वाढीस लागलेली दिसून येते. भारतीय संस्कृतीमध्ये समस्त मानवजातीच्या कल्याणाचा विचार केलेला आहे. आपण समाजासाठी समस्त मानवजातीसाठी सर्व प्राणिमात्रांसाठी आहोत ही भावना मनामध्ये रुजविण्याचे काम भारतीय संस्कृतीच्या मूल्यांनी केले आहे. तेव्हा कोरोनाच्या या संकटकाळी माणुसकीचे दर्शन घडविणारे अनेक घटक आपल्या अवतीभवती दिसले. गावात आणि शहरात लोकांना अन्न पुरविण्यासाठी अनेक सामाजिक कार्यकर्ते, तरुण मंडळी, उद्योगपती, वेगवेगळ्या सामाजिक संस्था यांनी सहकार्य केले. धार्मिक स्थळ, शाळा महाविद्यालये, दवाखाने हे आपापल्या परीने मानवतेचे द्योतक ठरलेले दिसून आले. त्याचप्रमाणे संयम, सेवा, प्रेम, ज्ञान, विवेक या सर्व अद्भूत मूल्यांचा साक्षात्कार आपणास आज या कोरोनाच्या संकटात असतांना जाणवतो तो म्हणजे डॉक्टर्स, पोलीस, समाजसेवक यांच्या रुपानेच. कारण त्यांच्या अविरत कार्यामुळे आज आपण घरात सुरक्षित आहोत हे विसरू शकणार नाही.

आज जागतिकीकरणाच्या रेटयात प्रत्येक जण धावतो आहे. 'गती' हे केवळ ध्येय आहे. सतत काहीतरी मिळविण्याचा ध्यास यामुळे आपण आपल्या संस्कृतीच्या या महान मूल्यांपासून कुठेतरी लांब गेलो किंवा विसरत चाललो होतो. परंतु निसर्गाने आपणास पुन्हा त्याची आठवण करून दिली आहे. भारतीय संस्कृतीमध्ये 'संयम' हा जणू आत्माच आहे. भारतीय संस्कृतीचा पायाच संयमावर आधारलेला आहे. पूर्वी समाजात एकत्र कुटुंबपध्दती होती. आज काळानुसार चित्र बदलले आहे. विभक्त कुटुंबपध्दती व सतत कमी कष्टात, सहजतेने, कमी काळात प्रत्येकाला आहे त्यापेक्षा अधिक मिळविण्याचा हव्यास लागलेला आहे. त्यानुसार पूर्वीचा एकत्रित कुटुंबपद्धतीला तडा जाऊन केव्हा विभक्त कुटुंब दिसू लागले हे लक्षातच अलि नाही. परंतु लॉकडाऊनच्या काळात मात्र कुटूंबामध्ये एकत्रित येणे हे संसारात मधुरता निर्माण करणारे ठरले. कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीशी सुसंवाद माधुर्य प्रस्थापित झाले. प्रत्येकाचे एकमेकांबद्दल आदर, प्रेम वाढले. स्वयंशिस्त, सात्विक आचरण,



Sakri (Dhule)
PRINCIPAL
Smt. V. N. Patil Arts & Dr. B. S. Desale Science College
Sakri, Tal. Sakri, Dist Dhule

 ISBN : 978-81-952462-0-5

आहार-व्यायाम या सर्व गोष्टी आपणास शिकण्यास मिळाल्या, 'मी' अशी भावना बाळगुन आपल्या आजूबाजूस कोणी नाही या भावनेने आपण वागत होतो ते कोरोनाकाळात लॉकडाऊनमुळे एकत्रित कुटुंबात राहून आपण, आपुलकी, प्रेम, संयम, सहकार्य या भावना वाढीस लागल्या.

आज अनेक पाश्चात्य देशामध्ये भारतीय संस्कृतीचा अभ्यास केला जातो. त्यांना आपल्या भारतीय संस्कृतीचे महत्त्व पटलेले आहे. अनेक ऋषीमुनी संत यांच्या शिकवणीनुसार मानवता जपण्याचा हा काळ आहे. तेव्हा पाश्चात्य संस्कृतीकडे आपण कदाचित अधिकच झुकत चाललो होतो की काय तेव्हा निसर्गाने समतोल साधण्यासाठी व आपल्या पवित्र, मंगलमय संस्कृतीची आठवण करून दिली. अशा या पावन आणि समृद्ध संस्कृतीला जपण्यासाठी आपण कटिबध्द असले पाहिजे. भारतीय संस्कृती मानव निसर्ग आणि पर्यावरण यांच्या अतूट सहसंबंधांशी निगडित आहे. कोरोना नावाच्या विषाणूने संपूर्ण जगाला हादरवून सोडले. कोरोनाने सामाजिक घडी विस्कळीत करून माणसांना माणसांपासून केवळ शारीरिक दृष्ट्याच नाही तर मानसिकदृष्ट्या देखील दूर केले आहे. मानवाने आजपर्यंत केलेली नेत्रदीपक प्रगती मग ती कोणत्याही क्षेत्रातील असो परंतु त्या प्रगती सोबत निसर्गाचा केलेला ऱ्हास आज मानवासाठी शाप ठरलेला आहे. जेव्हा कोरोनाग्रस्त रुग्णांसाठी ऑक्सिजनचा तुटवडा भासत होता तेव्हा वृक्षांची महती कळाली. भारतीय संस्कृतीमध्ये संत महिमा मानवीजीवनासाठी किती उपकारक, पथदर्शक, मार्गदर्शक आहे हे स्पष्ट झाले आहे. संत वाङ्मय, संत शिकवण एक प्रेरक बळ आहे. आज मानवाने स्वतःच आपली दुःखे निर्माण केली आहेत. किंबहुना वाढविली आहेत असेच म्हणावे लागेल. त्या त्या दुःखातून शाश्वत सुखाची पाऊलवाट दाखविण्याचे काम संतच करीत असतात. आजच्या या कोरोनाच्या संकटात ऑक्सिजन देणाऱ्या वृक्षांचे महत्व मानवास कळाले. निसर्गावर विजय मिळविण्याचा अट्टहास मानवाला घातक ठरला. मानसिक ताण-तणावातून मुक्त होण्यासाठी, शांती मिळविण्यासाठी आज आपण कृत्रिम निसर्गरम्य वातावरण तयार करीत आहोत. पशु, पक्षी, वृक्ष-वनस्पती यांच्याशी जिव्हाळ्याचे संबंध जोडण्याचे भारतीय संस्कृती शिकवते. 'वृक्षवल्ली आम्हा



Sakri (Dhule)
PRINCIPAL
I.S.S's Smt. V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

ISBN : 978-81-952462-0-5

सोयरे...' ही संत शिकवण आज माहिती-तंत्रज्ञानाच्या युगात किती वरदानन रूप होती हे कोरोनाच्या काळात मानवास लक्षात आले.

भारतीय संस्कृतीमध्ये सहिष्णुता, सहयोग याचे दर्शन घडते. कुटुंबात एकत्रित राहण्याचा योग कोरोनाने घडवुन आणला. अनेक चांगल्या बाबी कुटुंबात दिसू लागल्या. बाहेरून आल्यावर हात-पाय धुणे, प्रत्यक्ष भेटीत नमस्कार करणे, घर-परिसर स्वच्छ ठेवणे. ज्ञान विज्ञानाला हृदयाची, अध्यात्मची जोड देणारी ही संस्कृती नैतिक मूल्यांची जपणूक शिकविते. माणसाला जमिनीवर आणणारा हा कोरोना काळ, माणसाच्या डोळ्यावरून पैशांची धुंदी उतरविणारा ठरला. लॉकडाऊनमुळे काही शहरातून खेडयात आलेले कुशल, पारंगत लोकसमूह म्हणजे आपल्या गावांची संपत्ती असेल, जसे की शहरातून गावात आलेल्या तरुणांना संगणकीय, ज्ञान, कौशल्य, वेळ- पैसा यांच्या नियोजनाची सवय या सर्व बाबींमुळे गावांची अर्थव्यवस्था काही ठराविक महिन्यांमध्ये सुरळीत होऊन विकास होऊ शकतो. इतकेच नाही तर घरगुती अन्नपदार्थाचे सेवन, स्वच्छतेच्या बदललेल्या सवयी, अनावश्यक वाहतूक खर्चावरील नियंत्रण यामुळे पर्यावरणच नाही तर आपले आरोग्य देखील चांगले राहत असल्याचा प्रत्यय या काळात लोकांना येत आहे. चांगल्या स्वास्थ्यासाठी सूर्यनमस्कार, सात्त्विक आहार, सात्विक जीवनशैली पर्यावरणाचा सन्मान अशा अनेक गोष्टी आचरणात आणल्या जात आहेत त्याचे श्रेय मात्र भारतीय संस्कृतीला जाते. भारतीय संस्कृतीतील अनेक सवयी आता जगभरात उपयोगात आणल्या जात आहे. जसे की हे 'विश्वचि माझे घर' या उक्तीमध्ये असलेली मानवता, एकता याचे उदाहरण जगातील देश जेव्हा या संकटाचा सामना करतांना भारतीय संस्कृतीच्या मूल्यांचा आदर, पालन करीत होते त्यात दिसून येते. इतकेच नाही संस्कृतीमधील आध्यात्मिकता, संवेदनशीलता, भावना-जिव्हाळा या सर्व गोष्टींना एक वैश्विक रूप प्राप्त झालेले दिसून येते. कारण योग, यज्ञ, आध्यात्मिक ज्ञान यामुळे मानवाच्या शरीरातील, वातावरणातील जंतू नष्ट होऊन वातावरण स्वस्थ, स्वच्छ, संतुलित होण्यास मदत होऊ शकली.



Sakri (Dhule)
PRINCIPAL
T.S.S's Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College Sakri, Tal Sakri, Dist Dhule

ISBN : 978-81-952462-0-5

आज आपण विज्ञान-तंत्रज्ञानाच्या युगात वावरत असलो तरी मात्र भारतीय संस्कृतीतील आयुर्वेद ने खूप सकारात्मक बाबी जगाला पटवून दिल्या आहेत. निसर्गाशी पुन्हा सामंजस्य निर्माण करून सोबत आपली रोगप्रतिकारक शक्ती वाढविणे या गोष्टी शिकविणारा आयुर्वेद हा आपल्या समोर उभा असलेला कोरोनारूपी भस्मासूर नष्ट करू शकतो किंबहुना या दुष्टचक्रातून बाहेर निघण्याचा मार्ग सहज सापडेल.

एकूणच भारतीय संस्कृतीतील मूल्य, परंपरा, शैली यामुळे कोरोना सारख्या महासंकटाचा सामना करण्यास, तोंड देण्यास अद्यापही आपण सक्षम आहोत. हे विज्ञान, वैद्यकीयदृष्ट्या देखील सिद्ध झाले आहे जसे की, परंपरागत भारतीय खाण्याच्या-पिण्याच्या पद्धती, आयुर्वेदिक काढा, त्याच बरोबर ऑक्सिजन पातळी वाढविणारे, ध्यान, योग, प्रतिकारक शक्ती वाढविण्यासाठीचे आहार प्रातः सूर्यनमस्कार, शंख वाजविणे, जेणेकरून फुफ्फुस मजबूत होतात. दीर्घ श्वास घेऊन शंख वाजविण्याच्या क्रियेमुळे न्यूमोनिया होऊ शकत नाही. ही परंपरा संस्कृतीमध्ये दिसते. येथे निश्चितपणे नमूद करावेसे वाटते की स्वातंत्र्यानंतर आज ही आपण विज्ञान-माहिती तंत्रज्ञानाच्या युगात जगत असतांना अनेकविध क्षेत्रांमध्ये करीत असलो तरी त्या ज्ञान-विज्ञानात परंपरा, संस्कारमय संस्कृतीच्या अनेक बाबी समाविष्ट केल्या पाहिजे. जेणे करून भविष्यात स्वस्थ देश, सुफल देश कोणत्याही संकटांचा सामना करीत असतांना डगमगणार नाही. अर्थात भारतीय संस्कृत ही विज्ञान निष्ठ मानली हितकारक, निसर्गमय आहे याचा प्रत्यय साऱ्या विश्वाला कोरोनाच्या या महामारीच्या निमित्ताने आलाच आहे याविषयी दुमत नाही.

**संदर्भ :**


१. भारतीय संस्कृती - साने गुरुजी

२. महाराष्ट्र संस्कृती - पु. ग. सहस्त्रबुध्दे

३. सामान्य समाजशास्त्र - प्रा. पी. के. कुलकर्णी

४. समाजशास्त्र - डॉ. संगवे विलास

५. भारतीय समाजशास्त्र - एन. व्ही. गजेंद्रगड




Sakri (Dhule)

PRINCIPAL
C.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist Dhule